मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल


बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवड शहरातील नद्या होणार स्वच्छ?

## ३१२ पैकी २८० एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया; महापालिकेचा दावा

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी-चिंचवड शहरातून वाहणार्‍या पवना, इंद्रायणी व मुळा या तीन नद्या मोठ्या प्रमाणात प्रदूषित झाल्या आहेत. नदीपात्रात फेस, पाण्यास दुर्गंधी, प्रदूषणामुळे माशांचा मृत्यू, जलपर्णीत वाढ, तसेच डासांचा प्रादुर्भाव असे प्रकार आता शहरवासीयांना नित्याचे झाले आहेत. अशा घटनेंतर प्रशासनकडून थोडी फार धावपळ केली जाते. पुन्हा 'जैसे थे' परिस्थिती निर्माण होते. या तीनही नद्यांचे पुनरुज्जीवन (सुधार) करण्यासाठी महापालिका प्रकल्प राबवीत आहे. कोट्यवधींचा खर्च करूनही नद्यांचे पाणी गुजरातमधील साबरमतीप्रमाणे खरेच स्वच्छ होणार का, असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. सध्या



शहरातील नद्यांची अवस्था बिकट आहे. पावसाळ्यातील दोन, तीन महिने सोडल्यास नदीचे पात्र मोठ्या गटारासारखे दिसते. प्रदूषणामुळे पाणी काळपट झाल्याने त्यास मोठी दुर्गंधी येते. नदीकाठच्या रहिवाशांना डासांचा सामना करावा लागतो. मोठ्या प्रमाणात वाढलेली जलपर्णी काढण्यासाठी दरवर्षी सुमारे पाच कोटींचा खर्च होतो. शहरात अनेक ठिकाणी मैलासांडपाणी तसेच, रासायनिक सांडपाणी थेट नाल्यात सोडले जाते. ते नदीत जाऊन मिसळते. महापालिकेलाही शहरातून जमा होणार्‍या सर्व १०० टक्के मैलासांडपाण्यावर प्रक्रिया करून ते नदीत सोडण्यात यश आलेले नाही. नदी पात्रात अचानक फेस येणे. माशांचा मृत्यू होणे, असे प्रकार सातत्याने होत आहेत. त्याबाबत आरडाओरड झाल्यानंतर महापालिकेकडून एका दोघांवर कारवाई केली जाते. थोड्या दिवसांनी पुन्हा 'जैसे थे' परिस्थिती निर्माण होते. नदी पुनरूज्जीवनाचे तीनही नद्यांचे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पात्र स्वच्छ व सुंदर होणार आहे. त्यामुळे पर्यटनास चालना मिळणार आहे, असा महापालिकेच्या अधिकार्‍यांचा दावा आहे. आतापर्यंत नदी स्वच्छ करण्यासाठी महापालिकेने मोठ्या प्रमाणात खर्च केला आहे. मात्र, नदीपात्रे काही स्वच्छ झालेली नाहीत. पाणी स्वच्छ करण्यापेक्षा केवळ सुशोभीकरणात महापालिकेस रस असल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे प्रकल्प राबविल्यानंतरही नदीचे पाणी स्वच्छ होईल का ? शहरात नदी सुधार प्रकल्प राबविल्यास वरील भागातील नदीपात्रांची स्वच्छता कशी होणार, अशी शंका उपस्थित केली जात आहे. नदी प्रदूषणाकडे लक्ष वेधण्यासाठी शहरातील पर्यावरणप्रेमींनी नुकतेच आंदोलनही केले. शहरात दररोज ३१२ एमएलडी मैलासांडपाणी तयार होते. त्यापैकी २८० एमएलडी पाण्यावर महापालिकेच्या विविध ९ ठिकाणच्या १४ सांडपाणी शुद्धीकरण केंद्रांत (एसटीपी) प्रक्रिया केली जाते. त्यानंतर ते सांडपाणी नदी पात्रात सोडले जाते. केवळ ३२ एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया न करता ते सांडपाणी थेट नदी पात्रात सोडले जाते, असा दावा महापालिकेने केला आहे; मात्र शहरात दररोज ५०० एमएलडीपेक्षा अधिक सांडपाणी तयार होत असल्याचा अंदाज आहे.

### मंजुरीची प्रतीक्षा

**» अहमदाबादमधील साबरमती नदीच्या धर्तीवर महापालिका या तीन नद्यांसाठी पुनरूज्जीवन प्रकल्प राबवित आहे. त्यासाठी तब्बल ३ हजार ५०६ कोटींचा खर्च केला जाणार आहे. प्रकल्पांमुळे नद्या स्वच्छ व सुंदर होणार तसेच, नदी काठ परिसर सुशोभीकरण होईल, असा महापालिकेचा दावा आहे. मुळा नदीच्या पहिल्या टप्प्यातील ८.८० किलोमीटर अंतराचे कामासाठी ठेकेदार नेमला आहे. राज्याच्या पर्यावरण खात्याकडून सुधारित ना हरकत दाखला न मिळाल्याने काम सुरू झालेले नाही. तर, पवना व इंद्रायणी नदी आराखड्यास राज्य शासनाची अंतिम मंजुरी दोन ते तीन वर्षापासून प्रलंबित आहे.**

# वीजयंत्रणा धोकादायक असल्यास व्हॉट्सॲपवर कळवा

## पिंपरी चिंचवडसह हवेली तालुक्यांसाठी ७८७५७६७१२३ व्हॉट्सॲप क्रमांक

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** पश्चिम महाराष्ट्रातील शहरी व ग्रामीण भागामध्ये वीजतारा तुटणे, झोल पडणे किंवा जमिनीवर लोंबकळणे, फ्यूज पेट्या व फिडर पिलरचे दरवाजे तुटणे किंवा नसणे, खोदाईमुळे भूमिगत केबल उघड्यावर पडणे अशा वीजसुरक्षेला धोका निर्माण करणार्‍या यंत्रणेची माहिती मोबाईलच्या व्हॉट्सॲप द्वारे द्यावी, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे. पुणे परिमंडल अंतर्गत पुणे व पिंपरी चिंचवड शहरांसह हवेली तालुका तसेच मुळशी, वेल्हे, मावळ, खेड, जुन्नर व आंबेगाव तालुक्यांसाठी ७८७५७६७१२३ तसेच बारामती मंडल अंतर्गत बारामती, इंदापूर, दौंड, शिरूर, भोर व पुरंदर या तालुक्यांसाठी ७८७५७६८०७४ हा व्हॉट्सॲप मोबाईल क्रमांक महावितरणकडून उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच सोलापूर जिल्ह्यासाठी ७८७५४४०४५५, कोल्हापूर- ७८७५७६९१०३, सांगली- ७८७५७६९४४९ आणि सातारा जिल्ह्यासाठी ७८७५७६८५५४ हा व्हॉट्सॲप मोबाईल क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे. या सर्व क्रमांकावर फक्त वीज वितरण यंत्रणेपासून सुरक्षेचा धोका असल्याचा फोटो व संपूर्ण पत्ता किंवा लोकेशनसह माहिती / तक्रारी स्वीकारण्यात येत आहेत. त्यामुळे नागरिकांनी कॉल करण्याऐवजी फक्त व्हॉट्सॲप द्वारे माहिती द्यावी. तसेच ज्या नागरिकांकडे व्हॉट्सॲप नाहीत त्यांनी 'एसएमएस'द्वारे संबंधित मोबाईल क्रमांकावर माहिती दिल्यास त्याचेही निराकरण करण्यात येणार आहे. यासोबतच २४ तास सुरू असणार्‍या १८००-२१२-३४३५ किंवा १८००-२३३-३४३५ किंवा १९१२ या महावितरणच्या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधता येईल. महावितरणची वीजतार तुटलेली आहे. तारेचा झोल किंवा तार जमिनीवर लोंबळकत आहे. फ्यूज पेट्या किंवा फिडर पिलरचे झाकणे उघडे किंवा तुटलेले आहे. रोहित्राचे कुंपण उघडे आहे. खोदाईमुळे भूमिगत वाहिनी उघड्यावर आहे आदी स्वरुपाची माहिती/ तक्रारी छायाचित्रांसोबत संबंधित स्थळाच्या संपूर्ण पत्त्याचा उल्लेख करून किंवा लोकेशनसह व्हॉट्सॲप मोबाईल क्रमांकावर पाठवता येत आहे. व्हॉट्सॲपद्वारे प्राप्त झालेली फोटोसह माहिती किंवा तक्रार लगेचच संबंधित विभागीय व उपविभागीय कार्यालयात पाठविण्यात येत आहेत. त्याप्रमाणे वीजयंत्रणेच्या दुरुस्तीचे काम झाल्यानंतर संबंधित तक्रारकर्त्यांना व्हॉट्सॲपद्वारेच दुरूस्तीनंतरचे छायाचित्र पाठवून कळविण्यात येत आहे.

# चाकणमध्ये बैलगाडा शर्यतीचा थरार

## ६०० बैलगाडा, ७० हजार शर्यतप्रेमींचा प्रतिसाद



**पिंपरी । न्यूज एक्सप्रेस मराठी।** तब्बल ६०० छकडी बैलगाडा आणि सुमारे ७० हजार प्रेक्षकांच्या उपस्थितीत चाकणमधील घाटावर भारतातील सर्वात मोठी छकडी बैलगाडा शर्यतीचा थरार पहायला मिळाला. कात्रज, पुणे येथील निसर्ग गार्डनच्या सुंदर आणि हरण्या जोडीने मानाचा 'महान भारतकेसरी' किताब पटकावला आणि थार गाडी मिळवली. पिंपरी-चिंचवडमधील भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त विकास नाईकवाडी यांच्या पुढाकाराने पुणे जिल्ह्यात प्रथमच छकडी शर्यत (बैलगाडा) स्पर्धा आयोजित करण्यात आली. चाकण येथील बैलगाडा घाटावर महान भारतकेसरी शर्यती अत्यंत उत्साहात पार पडली.या स्पर्धेसाठी मध्यप्रदेश, पंजाब, उत्तरप्रदेश आदी राज्यांमधून गाडामालक सहभागी झाले. थार गाडी, टेम्पो, ट्रॅक्टर, ७० दुचाकी अशा भव्य बक्षीसांची उधळण यानिमित्ताने करण्यात आली. एकूण ६०० छकडी आणि सुमारे ७० हजार बैलगाडा प्रेमींनी या स्पर्धेचा प्रत्यक्ष घाटात आनंद घेतला. त्यामुळे महाराष्ट्रातीलच नव्हे, तर भारतातील सर्वात मोठी ही स्पर्धा ठरली आहे.

विकास नाईकवाडी म्हणाले की, राज्यातील बैलगाडा शर्यतीवरील बंदी उठवण्यासाठी आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला. त्याला राज्यातील कानाकोपऱ्यातून प्रतिसाद मिळाला. गल्लीपासून दिल्लीपर्यंत सुरू केलेल्या या लढ्याला यश मिळाले.

> **बैलगाडा शर्यत आणि महाराष्ट्रातील शेतकरी, भूमिपूत्रांचे अतूट नाते आहे. बैलगाडा शर्यतबंदी उठवण्यासाठी सुरू केलेल्या लढ्याला अखिल भारतीय बैलगाडा संघटनेसह सर्वच संस्था, संघटना आणि शर्यतप्रेमींनी योगदान दिले आहे. तत्कालीन मुख्यमंत्री व विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या लढ्याला मोठे पाठबळ दिले. हा शेतकऱ्यांचा थरारक खेळ टिकला पाहिजे. अशा स्पर्धांमुळे ग्रामीण अर्थचक्र सक्षम होत असल्यामुळे केलेल्या प्रयत्नांचे चीज झाल्याचे समाधान वाटते. स्पर्धा आयोजकांने आभार व्यक्त करतो.**
>
> **– महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

सर्वोच्च न्यायालयाने बैलगाडा शर्यतीवरील बंदी उठवली. त्यामुळे बैलगाडा शर्यतप्रेमी आणि शेतकऱ्यांमध्ये आमदार लांडगे यांच्याबाबत आदराची भावना आहे. त्यामुळेच आम्ही यावर्षी भारतातील सर्वात मोठी छकडी बैलगाडा शर्यत अर्थात महान भारत केसरी स्पर्धा भरवली. त्याला अपेक्षेप्रमाणे मोठा प्रतिसाद मिळाला आहे. प्रथम क्रमांक : निसर्ग गार्डन, कात्रज, पुणे (संदर आणि हारण्या), २- महालक्ष्मी प्र. विटा (बब्या आणि बावऱ्या), ३- भैरवनाथ प्र. बापुरसाहेब भाडळे वाघोली, उमेश शेठ फुरसुंगी (सरपंच आणि २२११ पिस्टन), ४- स्वामी साई सचिन घरत मोहीलशेठ धुमाळ, सुसगाव (बकासूर आणि सर्जा), ५- जोतिर्लिंग जितेंद्रशेठ देशमुख (लेंगरे) (चिक्या आणि वादळ), ६- स्वराज घिगे नाच्या ग्रुप मोशी (बलमा आणि लक्ष्मणराव), ७-श्रावणी दत्ता शिंदे (पाटखळ) (शिवराज आणि राजा), ८- आईगावदेवी प्र. रणवीर राहुलभाई पाटील (आ. कल्याण) (सिकंदर आणि वायर), ९-चेंडू ग्रुप मंगळापूर नेवसा अमोलशेठ ढगे (हारण्या आणि चिमण्या), १०- पै. सचिनशेठ चव्हाण, वाई (८१८१)(सिकंदर आणि वायर).

---

# डिलक्स चौकाला अतिक्रमणाचा विळखा पदपथ नामशेष!

## वाहतूक कोंडी, बेशिस्त पार्कींगमुळे पादचाऱ्यांचा जीव धोक्यात

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** डिलक्स चौकाला अतिक्रमणांनी विळखा घातला आहे. अनेक वर्षापासून पदपथ गायब झाले आहेत. वाहतूक कोंडी नित्याचीच झाली असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. महापालिका व पोलिस प्रशासनाने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



उपनगर व पिंपरी बाजारपेठ यांना जोडणाऱ्या चौकांपैकी हा एक महत्त्वाचा चौक आहे. मात्र, या चौकाची सध्या दयनीय अवस्था झाली आहे. चौकात बेशिस्तपणे छोटी-मोठी वाहने पार्क केलेली असतात. हातगाड्या, टपऱ्या व वाढीव बांधकामे यांनी रहदारीस अडथळा निर्माण झाला आहे. डिलक्स चौक ते शगुन चौकापर्यंत विविध दुकाने, हॉटेल, रूग्णालयाच्या आवारातच ग्राहकांची वाहने लावलेली असतात. त्यात बेशिस्त रिक्षा चालक अजूनच भर घालतात. त्यामुळे पादचाऱ्यांना मुख्य रस्त्यावरून चालावे लागते. अनेकदा छोटे-मोठे अपघातही होतात.

### काय करायला हवे

- अतिक्रमणे व वाढीव बांधकामांवर धडक कारवाई
- सुव्यवस्थित पदपथ उभारणे गरजेचे
- बेशिस्त रिक्षाचालकांना आवर घालणे
- कायमस्वरूपी वाहतूक पोलिसाची नेमणूक
- ग्राहकांसाठी पार्किंगची व्यवस्था करणे

# जरांगेंचा सरकारला निर्वाणीचा इशारा!

## मराठा आरक्षणाच्या कालबद्ध कार्यक्रमावरुन मनोज जरांगे आक्रमक

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** लेखी टाईम बॉन्ड देण्यासाठी येणाऱ्या शिष्टमंडळाकडून फक्त तारीख पे तारीख दिली जात असल्याचे चित्र आहे. आपण आजचं सरकारमधील काही मंत्र्यांना थेट फोन करून याबाबत जाब विचारणार असल्याचे जरांगे म्हणाले आहेत. तर, टाईम बॉन्ड देणार की नाही याबाबत आज सरकारला शेवटचं विचारणार असल्याचे जरांगे म्हणाले. त्यामुळे टाईम बॉन्डवरून सरकार आणि जरांगे पुन्हा एकदा आमने-सामने येण्याची शक्यता आहे.

राज्यात आतापर्यंत २९ लाख नोंदी सापडल्याचा दावा देखील मनोज जरांगेनी केला आहे. पुण्यातील खराडी भागात आज मनोज जरांगेंची सभा झाली. या सभेत ते बोलत होते.

मनोज जरांगे म्हणाले, १८०५ पासून १९६७ पर्यंत आणि सगळे पुरावे शोधण्याचे काम सुरू



झाले आहे. ओबीसी प्रवर्गात मराठे असल्याचं समोर आले आहे. राज्यात आतापर्यंत २९ लाख नोंदी सापडल्या आहेत. मग जर मराठा आरक्षणात येतो. तर ७० वर्षांपासून मराठ्यांचे कुणी वाटोळं केले याचे उत्तर द्या. आरक्षण कुणी मिळू दिल नाही त्याचं नाव आम्हाला द्या. आमचं भविष्य यांनी पूर्ण उध्वस्त केले आहे. आम्हला ७० वर्षा आधी आरक्षण दिलं असते तर जगात प्रबळ जात म्हणून एक नंबरला मराठे राहिले असते. आमचा नोकरीतला टक्का घसरला आणि ज्याची लायकी नाही त्याच्या हाताखाली काम करण्याची वेळ आमच्यावर आली. मराठा आरक्षणची लढाई खूप वर्षांपासून सुरू आहे. अनेकांनी टोकाची झुंज दिली आहे. मराठ्यांना आरक्षण मिळेपर्यंत सरकारला आता बिलकुल सुट्टी नाही, आमच्या हक्काचे आरक्षण आम्हाला पाहिजे. आम्ही कुणाचं घेत नाहीत पण आमचं मात्र आम्ही मिळवणार यात काही शंका नाही. ओबीसींना मिळालेले आरक्षण त्यांनी घ्यावं त्यांचा एक टक्का देखील आम्हाला नको, असे मनोज जरांगे यावेळी म्हणाले. मराठा समाज कायम सगळ्यांच्या कल्याणासाठी लढत राहिला. आम्ही कधी जातीवाद केला नाही. मराठा बांधवांनी कधीच कुणाची जात शोधली नाही. स्वतःच लेकरू उघड पडलं पण दुसऱ्याच्या लेकरांना सगळं दिले. जात कधी त्यांनी मानली नाही. माझ्या बापाने लोकांच्या लेकरांच्या डोळ्यातलं पाणी पुसवण्याचं काम केलं. लोकांना माझ्या बापाने पोटभर दिलं. आरक्षण देताना देखील आम्ही कधीच भेदभाव केला नाही. स्वतःच्या हक्कच आरक्षण दुसऱ्याला दिले. आम्ही सगळ्या समाजाला सढळ हाताने मदत केली. ७५ वर्षात या राज्यात जेवढे पक्ष झाले त्या पक्षातल्या नेत्यांना मोठे करण्याचे काम मराठा समाजांने केलं. आमच्या बांधवांनी कधी जात बघितली नाही. या नेत्यांना मराठ्यांनी मोठं केलं. मदत लागली तर हे धावून येईल म्हणून यांना मोठं केलं ज्यांना मोठं केलं ते देखील आज लेकराची मदत करायला तयार नाहीत, असे जरांगे म्हणाले. मराठा समाजाने ज्या नेत्यांवर विश्वास ठेवला आणि त्यांनीच आपला घात केला. समाज यांच्यासाठी राबला आणि याना मोठे केले. एकही नेता तुमच्याकडे बघायला तयार नाही आता तरी जागे व्हा. आपल्या लेकरांच्या आक्रोश ऐकायला आता कुणी राहिला नाही. कुणाची मदत आपल्याला होणार नाही. ज्यांना आपण मोठे केले तो आपल्यासमोर उभा आहे आणि म्हणतोय आरक्षण मिळू देणार नाही त्यामुळे जागे व्हा, आपली लढाई आपल्याला लढायची आहे असे देखील जरांगे या वेळी म्हणाले.

### विरोध करणारे वाढणार आहेत

» मराठा समाज कायम सगळ्यांच्या कल्याणासाठी लढत राहिला. आम्ही कधी जातीवाद केला नाही. मराठा बांधवांनी कधीच कुणाची जात शोधली नाही. स्वतःच लेकरू उघड पडलं पण दुसऱ्याच्या लेकरांना सगळं दिले. जात कधी त्यांनी मानली नाही. माझ्या बापाने लोकांच्या लेकरांच्या डोळ्यातलं पाणी पुसवण्याचं काम केलं. लोकांना माझ्या बापाने पोटभर दिलं. आरक्षण देताना देखील आम्ही कधीच भेदभाव केला नाही. स्वतःच्या हक्कच आरक्षण दुसऱ्याला दिले. आम्ही सगळ्या समाजाला सढळ हाताने मदत केली. ७५ वर्षात या राज्यात जेवढे पक्ष झाले त्या पक्षातल्या नेत्यांना मोठे करण्याचे काम मराठा समाजांने केलं. आमच्या बांधवांनी कधी जात बघितली नाही. या नेत्यांना मराठ्यांनी मोठं केलं. मदत लागली तर हे धावून येईल म्हणून यांना मोठं केलं ज्यांना मोठं केलं ते देखील आज लेकराची मदत करायला तयार नाहीत, असे जरांगे म्हणाले.

# धीरेंद्र शास्त्रींना २१ लाख रुपयांचं बक्षीस!

## पुण्यात अंनिसचं धीरेंद्र शास्त्रींना थेट आव्हान

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने बागेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्री बाबा यांच्यावर सत्संग व दरबाराच्या माध्यमातून अवैज्ञानिक आणि अंधश्रद्धला खतपाणी घालणारी वक्तव्ये व कृती केल्याचा आरोप केला आहे. तसेच धीरेंद्र शास्त्रींनी ते करत असलेले दावे सिद्ध करावेत. आम्ही त्यांना २१ लाख रुपयांचं बक्षीस देऊ, असं खुलं आव्हान दिलं आहे. याबाबत महा. अंनिसचे पूर्णवेळ कार्यकर्ते विशाल विमल यांनी निवेदन जारी करत संघटनेची भूमिका स्पष्ट केली. विशाल विमल म्हणाले, बागेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्री बाबा सत्संग व दरबाराच्या माध्यमातून अशास्त्रीय, अवैज्ञानिक, घटनात्मक तरतुदीविरोधी भाष्य आणि अंधश्रद्धला खतपाणी घालणारी वक्तव्ये, कृती, दावे करत असतात. त्याला महा. अंनिसने आक्षेप घेऊन बाबांवर गुन्हा नोंदवून कारवाई करण्याची मागणी शासन यंत्रणेकडे केली. तसेच बाबा जे अशास्त्रीय, अवैज्ञानिक, वक्तव्य, दावे, कृती करत आहे, त्यासंबंधी बाबांनी सोयीच्या ठिकाणी, नियंत्रित परिस्थितीत आणि वकील, पोलीस अधिकारी, निवडक कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील निवडक तज्ज्ञ मंडळींच्या कमिटीसमोर दावे, कृती सिद्ध करावेत. बाबांना २१ लाखांचे बक्षीस दिले जाईल, असे आव्हान बाबांना महा. अंनिसने वेळोवेळी दिले. मात्र, ते आव्हान बाबा लेखी स्वरूपात स्वीकारत नाहीत. पुण्यात सोमवार ते बुधवार या तीन दिवस बागेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्री बाबांचा सत्संग व दरबार कार्यक्रम होत आहे. त्या पार्श्वभूमीवर बाबांनी सोमवारी (२० नोव्हेंबर) पत्रकार परिषदेत महा. अंनिसने दिलेल्या आव्हान प्रक्रियेसंबंधी दिशाभूल करणारी वक्तव्ये केल्याचे प्रसारमाध्यमातून समजले. ते म्हणाले की, त्यांच्या दरबारामध्ये या, तुमचे काय म्हणणे आहे ते मांडा. आपण दूध का दूध आणि पाणी का पाणी करू, एकदाच आमने-सामने होऊन जाऊ द्या. मात्र, सोशल मीडियावर बाबांचे जे भक्त हिंसक प्रतिक्रिया देतात, स्वतः बाबाही अशास्त्रीय, असंवैधानिक, अवैज्ञानिक, अंधश्रद्धेला खतपाणी घालणारे, चिथावणीखोर आणि भडकावून वक्तव्य करतात. त्यामुळे आक्षेप, खुलासे, दाव्यांची सिद्धता दरबारात, सत्संगाच्या ठिकाणी शांततेत कशी होऊ शकते?, असा प्रश्न विशाल विमल यांनी विचारला.

### ही बाबांनी काढलेली पळवाट

» विशाल विमल पुढे म्हणाले, उलट दरबारात आमने सामने आल्यास कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे वस्तुस्थिती पाहता बाबांच्या दरबारात अथवा सत्संगाच्या ठिकाणी कायदा सुव्यवस्था पाळण्याची जबाबदारी असणारी शासन यंत्रणा, पोलीस यंत्रणा आणि खुद्द बाबाही आमने-सामने वक्तव्य आणि दाव्यांची सिद्धता चाचणी पार पाडू शकत नाहीत. त्यामुळे दरबारात, सत्संगाच्या ठिकाणी आमने-सामने यावे असे म्हणणे ही बाबांनी काढलेली पळवाट आहे.

# करोनामुळे पालक गमावलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्क माफीचा अहवाल द्या!

## उच्च शिक्षण विभागाचा विद्यापीठांना आदेश

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** करोनामुळे आई-वडील, पालक गमावलेल्या विद्यार्थ्यांचे पदवी, पदव्युत्तर पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत संपूर्ण शुल्क माफ करण्याच्या सूचना उच्च शिक्षण विभागाने सर्व विद्यापीठे, महाविद्यालयांना दिले आहे. तसेच इतर विद्यार्थ्यांकडून या कालावधीतील अतिरिक्त शुल्क माफ करण्याबाबतही स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र अनेक महाविद्यालयांकडून या आदेशाचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आले असून, आता उच्च शिक्षण विभागाने या बाबतचा अहवाल मागवला आहे. उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी याबाबतचे निर्देश परिपत्रकाद्वारे दिले. करोनामुळे पालक, आई-वडील गमावलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचे पदवी, पदव्युत्तर शिक्षण पूर्ण होईपर्यंतचे संपूर्ण शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अनुदानित महाविद्यालये, विद्यापीठ विभागातील सर्व अभ्यासक्रमांसाठीच्या इतर शुल्कांमधील जिमखाना शुल्क, विविध गुणदर्शन उपक्रम शुल्क, नियतकालिक शुल्क, संगणक शुल्क, क्रीडा निधी, वैद्यकीय मदत निधी आणि युवा महोत्सव अशा ज्या बाबींवर खर्च न झाल्याने त्यासाठीचे शुल्क पूर्णपणे माफ करावे, प्रयोगशाळा आणि ग्रंथालय यांची देखभाल, ग्रंथालयांमध्ये ई साहित्यासाठीच्या शुल्कात ५० टक्के सवलत, वसतिगृहाचा वापर न झाल्याने वसतिगृहाचे शुल्क पूर्णपणे माफ करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. तर विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालयातही इतर शुल्कांमधील जिमखाना शुल्क, विविध गुणदर्शन उपक्रम शुल्क, नियतकालक शुल्क, संगणक शुल्क, क्रीडा निधी, वैद्यकीय मदत निधी आणि युवा महोत्सवावर खर्च न झाल्याने त्यासाठीचे शुल्क माफ करावे, प्रयोगशाळा आणि ग्रंथालय शुल्कात ५० टक्के सवलत द्यावी, २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात ज्या वर्षाच्या परीक्षा झालेल्या नाहीत त्या वर्षाचे परीक्षा शुल्क पुढील शैक्षणिक वर्षात समायोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांकडे प्रलंबित असलेले शुल्क तीन ते चार टप्प्यात भरण्याची सवलत देण्यात यावी, तसेच शुल्क थकित असल्यास परीक्षेचा अर्ज करण्यास अडवू नये, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान न होण्याची ताकीद देण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर, महाविद्यालयांनी शासन निर्देशांचे पालन केल्याचे दिसून येत नाही. विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड न पडण्याच्या दृष्टीने शासन निर्देशानुसार कार्यवाही करण्याबाबत विद्यापीठांना कळवण्यात आले आहे.



### तर राऊतांना पासपोर्ट देऊ

**» २०२०-२१ आणि २०२२-२२ या शैक्षणिक वर्षात किती विद्यार्थ्यांना शासन निर्देशांनुसार लाभ दिलेला आहे, याबाबतची वर्षनिहाय माहिती संचालनालयास पाठवण्याबाबत डॉ. देवळाणकर यांनी स्पष्ट केले.करोनामुळे आई-वडील, पालक गमावलेल्या विद्यार्थ्यांचे पदवी, पदव्युत्तर पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत संपूर्ण शुल्क माफ करण्याच्या सूचना उच्च शिक्षण विभागाने सर्व विद्यापीठे, महाविद्यालयांना दिले आहे. तसेच इतर विद्यार्थ्यांकडून या कालावधीतील अतिरिक्त शुल्क माफ करण्याबाबतही स्पष्ट करण्यात आले आहे.**

# ललितला पळून जाण्यास मदत करणारे पोलीस काळे!

## जाधव शासकीय सेवेतून बडतर्फ

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** कुख्यात ड्रग्ज माफिया ललित पाटील याच्या मदतीने ससून रूग्णालयातून ड्रग्जचे डिलींग होताना २ कोटी १४ लाखांचे मेफेड्रॉन पुणे पोलिसांनी पकडले होते. त्यानंतर ललित पाटील याच्यावर चोख बंदोबस्त ठेवण्या ऐवजी त्याला पळून जाण्यास मदत केल्याप्रकरणी कोर्ट कंपनीचे पोलिस नाईक नाथाराम भारत काळे आणि पोलिस शिपाई अमित सुरेश जाधव या दोघांना पोलिस दलातून बडतर्फ (शासकीय सेवेतून बडतर्फ) करण्यात आले आहे. नुकताच त्यांच्यावर निलंबनाची तसेच या गुन्ह्यातील सहभाग निष्पन्न झाल्यानंतर अटकेची कारवाई करण्यात आली होती. नाथाराम काळे याच्याकडे करण्यात आलेल्या चौकशीत तो ललित याला सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास एक्सरे काढण्यासाठी घेऊन गेला होता तेव्हा ललित झटका देऊन पळून गेला होता असे त्याने सांगितले होते. मात्र प्रत्यक्षात ललित पाटीलला काळे एक्सरेसाठी घेऊनच घेला नसल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. दरम्यान




ललित पाटील याला पळून जाण्यास मदत कणारा विनय अर्हानाचा चालक दत्तात्रय डोके याला स्वतःच्या मोबाईल फोनवरून तीन कॉल लावल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच जाधव यानेही दोनदा डोके याला फोन लावल्याचे निष्पन्न झाले आहे. २ ऑक्टोबरला ससून रूग्णालातून ललित पाटील हा चालत जात असल्याचे दिसत असून काळे आणि अमित जाधव दोघेही हॉस्पिटलच्या मधील कॅन्टीन जवळ एकत्रितरित्या टाळी देताना दिसले. तसेच ललित पाटील गेल्यानंतर गणवेशावर दुसरा शर्ट परिधान केल्याचे सीसीटिव्ही फुटेज वरून दिसून आले आहे. तसेच ललित पाटील लेमन ट्री हॉटेलमध्ये शिरल्यानंतर काळे हा हॉटेलच्या व्यवस्थापकाबरोबर बोलत असल्याचेही निष्पन्न झाले आहे. त्यामुळे ललित पाटील पोलिसांच्या ताब्यातून पळून गेल्याचा बनाव करून तीन तासानंतर पोलिस नियंत्रण कक्षाला याची माहिती उशीरा दिल्याने पोलिस सतर्क होऊ शकले नाही. त्यामुळे ललित पाटील याला पळून जाण्यास काळे आणि जाधव यांनी मदत केल्याचे निष्पन्न झाले. काळे याच्यावर पत्नीचा छळ केल्याप्रकरणी २०१४ मध्ये गुन्हा दाखल होता. त्यावेळीही काळेचे निलंबन झाले होते. वर्तुणुकी बदल न झाल्याने पोलिसांना ललित प्रकरणात खोटा व दिशाभुल करणारी माहिती दिल्याने पोलिस दलाची प्रतिमा मलिन केल्याने काळे यांना अपर पोलिस आयुक्त प्रशासन अरविंद चावरिया यांनी बडतर्फ करण्याचे आदेश दिले.